प्रेस नोट

दिनांक २७/११/२०१८

| | |
|---|---|
| अेसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्री. सागर आत्माराम शेलार, वय-३२ वर्षे शाखा अभियंता, महाराष्ट्र विदयुत वितरण कंपनी मर्यादित, खोपी शाखा, ता. खेड जि. रत्नागिरी |
| कार्यालय | महाराष्ट्र विदयुत वितरण कंपनी मर्यादित, खोपी शाखा, ता. खेड जि. रत्नागिरी |
| लाच स्विकारल्याचे ठिकाण | शिवाजी चौक ते खेड बाजारपेठ जाणारे रोडवर सिटी सेंटर बिल्डींग समोर, ता. खेड जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाचेची रक्कम | २५,०००/-रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५,०००/- रु. |
| थोडक्यात हकिगत | यातील तकारदार यांनी कुंभाड ता. खेड जि. रत्नागिरी येथे जमीन विकसित करण्यासाठी तेथे तात्पुरती शेड बांधुन घेतली आहे. त्या शेडमध्ये इलेक्टीक कनेक्शन घेण्यासाठी तक्रारदार यांनी महावितरण लोटे विभाग ता. खेड,(खोपी)डिव्हीजन यांच्याकडे अर्ज करुन, इलेक्टीक मीटरचे कोटेशन त्यांनी बँकेमध्ये भरणा केले होते. त्या शेडपर्यंत इलेक्टीक कनेक्शन आणण्यासाठी दोन पोलची आवश्यकता आहे असे लोकसेवक वायरमन महाडीक व शेलार साहेब यांनी तकारदार यांना सांगुन ते दोन पोल उभे करुन देण्यासाठी त्यांनी तकारदार यांचेकडे २५,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती. म्हणुन तकारदार यांनी अेसीबी रत्नागिरी कार्यालयाकडे दिनांक २१/११/२०१८ रोजी तकारी अर्ज दिला होता. सदर तकारीच्या अनुषंगाने दिनांक २६/११/२०१८ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, तक्रारदार यांनी बांधलेल्या शेडपर्यंत चॅनल उभा करुन तात्पुरते इलेक्टीक कनेक्शन देण्यासाठी लोकसेवक शेलार यांनी तकारदार यांचेकडे २५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन, ती लाच रक्कम दिनांक २७/११/२०१८ रोजी घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने आज दिनांक २७/११/२०१८ रोजी सापळा आयेजित करुन लोकसेवक शेलार यांना तकारदार यांचेकडून २५,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यानंतर आज दुपारी १२.११ वाजता शिवाजी चौक ते खेड बाजारपेठ जाणारे रोडवर सिटी सेंटर बिल्डींग समोर, ता. खेड जि. रत्नागिरी येथे पंचासमक्ष लाच रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau RATNAGIRI

(बी ए तळेकर)
पोलीस निरिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो रत्नागिरी